शनिवार दि.१ जून २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २७४
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
# दैनिक लोकनेता
बीड
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

# अजित पवारांच्या नेत्यांत जुंपली:भुजबळांनी आव्हाडांना पाठिंबा देणे दुर्दैवी- हसन मुश्रीफ

## सीनिअर लोकांवर काय बोलणार? -भुजबळ



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

भुजबळांनी आव्हाडांना खडेबोल सुनावले पाहिजेत मात्र त्यांचे पाठिंबा देण्याचे विधान अत्यंत दुर्दैवी आहे असे म्हणत मंत्री हसन मुश्रीफ यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्यावर टीका केली आहे. मनुस्मृतीचा मुद्दा कुठेतरी बाजूला पडेल म्हणून, पाठिंबा देण्याचे वक्तव्य करणे हे अतिशय दुर्दैवी आहे असे हसन मुश्रीफ म्हणालेत. त्यांच्या या विधानानंतर आता अजित पवार गटाच्या दोन्ही नेत्यांमध्ये जुंपल्याचे चित्र आहे.

छगन भुजबळ यांनी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांची पाठराखण केली. त्यांच्याकडून चूक झाली. त्यांनी माफीही मागितली. आता विरोधाला विरोध करायचा म्हणून त्यांच्यावर टीका करण्यात अर्थ नाही असे भुजबळ म्हणाले होते. यवरूनच हसन मुश्रीफ यांनी हल्ला चढवला आहे. मुश्रीफ म्हणाले, ''जितेंद्र आव्हाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो असलेलं पत्रक फाडलं हे निंदनीय आहेच. पण आमच्या छगन भुजबळ यांनी आव्हाड यांची बाजू घेतली. मनुस्मृतीचा मुद्दा कुठे तरी बाजूला पडेल म्हणून आव्हाड यांना पाठिंबा देण्याचं विधान भुजबळ यांनी केलं हे अत्यंत दुर्देवी आहे'', असा आरोप मुश्रीफांनी केला आहे.

पुढे मुश्रीफ म्हणाले, भुजबळांनी आव्हाड यांना खडेबोल सुनावले पाहिजे होते. त्यांची कृती ही अत्यंत चुकीची आहे. याबाबत त्यांनी बोलायला हवं होते''. शिवाय सध्या भुजबळांना राज्यसभेवर पाठवण्याची जोरदार चर्चा सुरू आहे. यावर देखील मुश्रीफ यांनी प्रतिक्रिया दिली आहे. छगन भुजबळ यांना राज्यसभेवर पाठवण्याबाबतची माझ्याकडे काहीच माहिती नाही. या संदर्भात आमचे नेते अजित पवारच सांगू शकतील असे मुश्रीफ म्हणाले.तसेच पुढे बोलतांना ते म्हणाले, ''निवडणूक आयोगाने आचारसंहितेत दुष्काळ संदर्भात काम करण्यासाठी सूट दिली पाहिजे. मुख्यमंत्र्यांना सुद्धा निवडणूक आयोगाची परवानगी घेऊन बैठक घ्यावी लागली. निवडणूक आयोगाने तात्काळ दुष्काळाच्या कामासाठी सवलत दिली पाहिजे'', अशी मागणीही त्यांनी केली.हसन मुश्रीफ यांच्या या टीकेला छगन भुजबळ यांनी प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले की, हसन मुश्रीफ सीनिअर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे. जितेंद्र आव्हाडांवर काय टीका करायची ती करा. पण टीका करायचा अधिकार तुम्हाला कधी येतो, तुम्ही मनुस्मृतीला विरोध कराल त्यावेळेला तो अधिकार येईल. हे लोक मनुस्मृती बाजूला ठेवतात आणि जितेंद्र आव्हाड, जितेंद्र आव्हाड सुरू करतात, असे ते म्हणाले.तुम्हाला बाबासाहेब आंबेडकरांबद्दल प्रेम आहे हे मला मान्य आहे. ते असलेच पाहिजे. पण बाबासाहेबांना नको असलेली, बहुजन समाजाला नको असलेली मनुस्मृती तिचा तुम्ही निषेध करायला पाहिजे. ती शालेय शिक्षणात येता कामा नये एवढेच माझे म्हणणे आहे. बाकी सीनिअर लोकांबद्दल मी काय बोलणार, असेही भुजबळ यावेळी बोलताना म्हणाले.

# राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त परळी येथे रक्तदान शिबिर संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | विजय रोडे**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या २९९ व्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवानिमित्त होळकर चौक,परळी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये अनेक नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला या भागाचे नगरसेवक गोविंद कुकर, बापू बिरू वाटेगावकर सहभाग संस्थेचे पदाधिकारी व समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस अभिवादन करून रक्तदान दान शिवराज सुरुवात झाली. रक्तदानाचा कार्यक्रम घेऊन एक वेगळा पांडा पाडण्याचं काम या भागातील तरुण व नागरिक व सेवाभावी संस्थेने केले आहे.या रक्तदान शिबिरात होळकर चौक परिसरातील गोविंद कुकर, केशव नागरगोजे मुंजा फुके, रामभाऊ कुकर, अमोल सरवदे, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष आकाश कुकर, किशोर सरवदे, मुंजा सरवदे, आधी उपस्थित होते.

### ५ जून पर्यावरण दिनी पर्यावरण मंडळाच्या वतीने

# वृक्षमित्र स्व.आबासाहेब मोरे जयंती व पर्यावरण कार्यकर्ता मेळाव्यास निसर्गप्रेमीने बहुसंख्येने उपस्थित राहावे -प्रमोद मोरे

## निमंत्रणासाठी पर्यावरण मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली पद्मभूषण डॉ.अण्णा हजारे यांची भेट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**



निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ,महाराष्ट्र राज्य व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,अहमदनगर यांच्या संयोजनाने बुधवार दि. ५ जून रोजी सकाळी १०.३० वा. राळेगणसिद्धी तालुका पारनेर येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने पर्यावरण कार्यकर्ता मेळावा व वृक्षमित्र स्व. आबासाहेब मोरे यांची जयंती साजरी करण्यात येणार आहे. अशी माहिती पर्यावरण मंडळाचे अध्यक्ष प्रमोद दादा मोरे यांनी दिली.५ जून रोजी होणाऱ्या पर्यावरण दिनाच्या कार्यक्रमाची कार्यक्रम पत्रिका राळेगणसिद्धी येथे थोर समाजसेवक पद्मभूषण डॉ.अण्णा हजारे यांना प्रदान करून पर्यावरण मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी अण्णा हजारे यांची भेट घेतली.यावेळी निसर्ग व सामाजिक पर्यावरण मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे,जिल्हाध्यक्ष तुकाराम अडसूळ,महिला जिल्हाध्यक्ष लतिकाताई पवार, पर्यावरण मंडळ सदस्य श्रीमती आशाताई कांबळे आदींसह पर्यावरण मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी थोर समाजसेवक पद्मभूषण डॉ.अण्णासाहेब हजारे उपस्थित राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून-पद्मश्री गिरीश प्रभुणे (ख्यातनाम समाजशिक्षक व लेखक) तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून चद्रकांत शिंदे (उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर.ड प्रभाकर तावरे (मा.आरोग्य अधिकारी,पिंपरी परी चिंचवड मनपा.)

संजय देवरे चेअरमन, एस.के.डी.इंटरनॅशनल स्कुल, भावडे,ता.देवळा,जि.नाशिक

प्रभाकर म्हस्के सेवानिवृत्त सहाय्यक वनसंरक्षक वनविभाग पालघर आदी मान्यवर पर्यावरण प्रेमींना मार्गदर्शन व उद्बोधन करण्यासाठी उपस्थित राहणार आहेत.कार्यक्रमावेळी पर्यावरण मंडळाचे ज्येष्ठ सदस्य विलास महाडीक (सेवानिवृत्त केंद्रप्रमुख) यांचा सेवापूर्तीचा सन्मान सोहळा कार्यक्रम याप्रसंगी होणार आहे.

तरी पर्यावरण मंडळाचे पदाधिकारी व पर्यावरण प्रेमींनी कार्यक्रमासाठी आपली नाव नोंदणी अध्यक्ष महोदय यांकडे करावी असे आवाहन पर्यावरण मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

तरी स्व.आबासाहेब मोरे यांची जयंती व पर्यावरण कार्यकर्ता मेळावा या कार्यक्रम प्रसंगी पर्यावरण मंडळाचे पदाधिकारी व पर्यावरण प्रेमी यांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे अध्यक्ष प्रमोद दादा मोरे व मंडळाच्या सचिव वनश्रीताई 'मोरे' गुणवरे,राज्य कार्याध्यक्ष उत्तम पवार,

राज्य प्रसिद्ध प्रमुख तथा राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष अध्यक्ष अण्णासाहेब साबळे यांच्यासह पदाधिकारी यांनी केले.

# पब्लिसिटी हेच जितेंद्र आव्हाडांचे अंतिम ध्येय

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाड येथे मनुस्मृतीला विरोध करताना शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो फाडला होता. यावरून भाजपा विधानपरिषद गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी जितेंद्र आव्हाड यांच्यावर जोरदार टिकास्त्र सोडले आहे.दरेकर म्हणाले की, जितेंद्र आव्हाडांची नौटंकी राज्यातील जनतेच्या समोर आली आहे. मनुस्मृती संदर्भात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भूमिका स्पष्ट केली आहे कि असा कोणत्याही प्रकारचा समावेश केला जाणार नाही. परंतु केवळ राजनैतिक नौटंकी करायची, समाजातील लोकांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी या विषयाचा मी मोठा काही वाली आहे अशा प्रकारचे ढोंग मनुस्मृतीच्या निमित्ताने जितेंद्र आव्हाड यांनी घेतले होते, त्याची पोलखोल उघड झाली आहे. संपूर्ण महाराष्ट्रात भाजपने उत्स्फूर्तपणे आंदोलन केले आहे.

## चारोळी

मैत्री सारखं निखळ नातं
कुठेच शोधून सापडत नाही
अंतरंग ओसंडून वाहते अन
आठवांच्या हिंदोळ्यावर झुलत राही.

रंजना सानप
मायणी (सातारा)

### शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीच्या श्लोकांचा समावेश करण्याच्या

# निषेधार्थ फुले-शाहू- आंबेडकरी नागरिकांच्या वतीने मुख्यमंत्र्यांना निवेदन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | विजय रोडे**



महाराष्ट्र राज्य सरकारच्या वतीने नवीन शालेय शैक्षणिक आराखडा २०२४ तयार करण्यात आला आहे. या आराखड्यात विषमतावादी आणि वर्णव्यवस्था निर्माण करणाऱ्या मनुस्मृतीतील श्लोकांचा समावेश करण्याच्या निषेधार्थ परळी शहरातील फुले-शाहू-आंबेडकरी नागरिकांच्या वतीने तहसीलदारांच्या मार्फत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना दि.३१ मे रोजी निवेदन देण्यात आले.

या निवेदनात पुढे म्हटले आहे की, केंद्र सरकारच्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार महाराष्ट्र राज्य सरकारच्या वतीने नवीन अभ्यासक्रम आराखडा नुकताच शिक्षण विभागाने प्रकाशित केला आहे. या आराखड्यात शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीतील श्लोक, भगवत गीतेतील तसेच रामदास स्वामी यांचे काही श्लोक समावेश करण्यात येणार आहेत. भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. महामानव, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे मानवतेला कलंक असणाऱ्या मनुस्मृतीची होळी करून या ग्रंथाचा जाहीर निषेध केला होता. . त्यामुळे या ग्रंथातील एकही श्लोक अभ्यासक्रमात समावेश करण्यात येऊ नये. समाविष्ट करायचा असेल तर भारतीय संविधानातील नागरिकांचे अधिकार आणि कर्तव्य, तसेच राष्ट्रसंत तुकोबाराय, संत गाडगे महाराज, क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले आदि महापुरुषांच्या विचारांचा समावेश करण्यात यावा. तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले संविधानाला अपेक्षित साहित्य अभ्यासक्रमात समाविष्ट करावे अशी मागणीही याप्रसंगी करण्यात आली आहे. मागण्याचे निवेदन यावेळी नायब तहसीलदार रुपनर यांनी स्वीकारले.

या निवेदनावर प्रा. दासू वाघमारे, प्रा. विलास रोडे, रानबा गायकवाड, भगवान साकसमुद्रे,मुक्ताराम गवळी, अशोक वाघमारे, प्रा. प्रदीप बुक्तर ,पत्रकार शेख मुकरम,पत्रकार कैलास डुमणे, पत्रकार विकास वाघमारे, दीपक शिरसाठ, पत्रकार विजय रोडे, अशोक गायकवाड आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# अहिल्याबाई होळकर यांना अंजनी येथे अभिवादन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली | गौतम गावंडे**

बिलोली तालुक्यातील मौजे अंजनी ग्रामपंचायत येथे दिनांक ३१ मे २०२४ रोजी सर्व जाती धर्माच्या वतीने राजमाता, लोकमाता, राष्ट्रमाता, समाज भूषण, कुलभूषण, कर्मयोगिनी, रणरागिणी अशा अनेक नावाने प्रसिद्ध असणारी महाराणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती अंजनी ग्रामपंचायत येथे जयंती साजरी करण्यात आली आहे व सर्व गावकऱ्यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले आहे यावेळी अंजनी गावचे प्रथम नागरिक सरपंच महेश पाटील हांडे, इरेश मुंडकर, देविदास पाटील, गणपत धानेकर, शेषराव पाटील, जयदीप गावंडे, उत्तम भुसेवाड, सुधाकर बावलगावे, ज्ञानेश्वर धानेकर, रमेश बावलगावे, मष्णाजी भोकरे, सचिन मजगे, सलिम शेख, नझिर शेख आदी मान्यवर उपस्थित होते

# चंद्रपुरात उष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट

**पुणे**–राज्यात आज विदर्भामध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. तर मराठवाड्यात आणि मध्य महाराष्ट्र विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाची शक्यता असल्याचे हवामान खात्याने म्हंटले आहे. विशेषतः विदर्भातील चंद्रपुरात उष्ण लाटेचा इशारा देण्यात आला आहे.महाराष्ट्रात देखील विदर्भामध्ये उन्हाचा तडाखा अधिक तापदायक ठरत आहे.

# महाराणी अहिल्यादेवी होळकर

लोकनेता न्युज नेटवर्क

मे एकतीसला । जन्माला येऊन ।
घडविले जन । महेश्वरी ।। १ ।।
सुशीला मातोश्री । माणकोजी पिता ।
पेटविल्या वाता । विकासाच्या ।। २।।
मुक्ताबाई लेक । पती खंडेराव ।
पुत्र मालेराव । परिवार ।। ३ ।।
चौंडी ग्राम नाम । दूर पोहोचले ।
कर्तृत्व गाजले । भारतात ।। ४ ।।
येताच वैधव्य । नाही गेल्या सती
जुळविली नाती । जनतेशी ।। ५ ।।
सम्राज्ञी महान । माळवा प्रांताची ।
मल्हाररावांची । क्रांतिस्नुषा ।। ६ ।।
अहिल्यादेवी ही । एक महाराणी ।
एक राजधानी । महेश्वर ।। ७ ।।
राजधानीमध्ये । जन घडविले ।
नाम थोर केले । होळकर ।। ८ ।।
मानलाच नाही । जाती धर्म भेद ।
सर्वांनाच छेद । कर्मातून ।। ९ ।।
शेतकरी राजा । झाला पूर्ण सुखी ।
कोणीच ना दुःखी । करमुक्ती ।। १० ।।
साक्षरता वृद्धी । विकासात भर ।
प्रगतीचं वारं । महेश्वरी ।। ११ ।।
दरोडेखोरांना । आश्रय देऊन ।
सु-परिवर्तन । घडविले ।। १२ ।।
थोर महाराणी । सम्यक कर्मांत
प्रजा आनंदात । महेश्वरी ।। १३ ।।
तलाव विहिरी। बांधुनिया दिले ।
आनंदित केले । शेतकरी ।। १४ ।।
न्यायदान देवी । पुण्यश्लोक राणी ।
गाऊ कर्म गाणी । अहिल्येची ।। १५ ।।
जनतेची राणी । थोर तपस्विनी ।
एक तेजस्विनी । अहिल्याच ।। १६ ।।
उदार शासक । दानशूर राणी ।
नारी स्वाभिमानी । अहिल्याच ।। १७ ।।
अहिल्यादेवीला । आज जन्मदिनी ।
वंदन करांनी । कोटी कोटी ।। १८ ।।







**समाज भूषण पुरस्कार प्राप्त अभंगकार**
**प्रा.अरुण बाबारावजी बुंदेले,**
**रुक्मिणी नगर,अमरावती**

# मा.आमदार चैनसुख संचेती गटाने १३ विरुद्ध २ ने जिंकला अविश्वास ठराव





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**

मलकापूर:कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवचंद्र तायडे हे बाजार समितीचा कारभार करतांना व धोरणात्मक निर्णय घेतांना बाजार समितीच्या सदस्यांना विश्वासात घेत नाही. तसेच अधिनियमातील तरतूदीनुसार बाजार समितीच्या सभा घेवून कामकाज करीत नाही असा ठपका ठेवत संचालकांनी सभापती शिवचंद्र तेजराव तायडे यांचे विरुध्द अविश्वासाचा ठराव पारीत केला. मा.आमदार चैनसुख संचेती गटाने १३ विरुद्ध २ ने हा अविश्वास ठराव जिंकला आहे.

सभापती शिवचंद्र तेजराव तायडे यांचे विरुध्द अविश्वासाचा ठराव मांडण्यासाठी व त्यावर निर्णय घेण्यासाठी बाजार समितीची विशेष सभा बोलाविण्यात यावी अशी मागणी १४ संचालकांनी दिनांक २१ मे रोजी जिल्हाधिकारी बुलढाणा यांचेकडे करण्यात आली होती. त्या अनुषंगाने दिनांक ३१ मे रोजी सकाळी ११ वाजता विशेष सभा बोलविली होती. या सभेच्या अनुषंगाने संपूर्ण नांदुरा रोडवर पोलिसांनी तगडा बंदोबस्त ठेवला होता.दरम्यान भाजपा नेते चैनसुख संचेती यांच्या वाहनाच्या पाठीमागील वाहनातून संचालक बाजार समितीकडे येत असतांनाच शिवचंद्र तायडे यांच्या समर्थकांनी त्या वाहनाला रोखण्याचा प्रयत्न केला.या परिस्थितीत पोलिसांनी बंदोबस्तात वाहन समोर काढले. संचालक मंडळ बाजार समितीच्या सभागृहात पोहोचले. सभेला सुरुवात झाली त्यावेळी आजची सभा तहकूब करणे बाबत शिवचंद्र तायडे यांचेकडून लेखी स्वरूपात विनंती अर्ज सादर करण्यात आला. दरम्यान ठरावाचे सभेसमोर वाचन करण्यात आले. विद्यमान सभापती शिवचंद्र तायडे यांच्यावर अविश्वास ठराव वाचन करण्यात येऊन ठरावाच्या बाजूने १३ सदस्यांनी हात वर करून मतदान केले.यावेळी पोलिसांनी परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्याकरिता उपविभागीय पोलिस अधिकारी देवराव गवळी, पोलीस निरीक्षक अनिल गोपाळ, नांदुऱ्याचे पोलीस निरीक्षक विलासराव पाटील, एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक हेमराज कोळी ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदीप काळे सज्ज होते. तर त्यांच्या दिमतीला १४ पोलीस अधिकारी ८२ पोलीस कर्मचारी ४० कर्मचाऱ्यांचे दोन आरसीपी पथक सुद्धा होते.

**कलम १४४ लागु असताना दोन्ही गटाच्या समर्थकांची गर्दी**

कृ.ऊ.बा समिति परीसरात कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी व सभेत निर्भय, निःपक्षपाती मतदान प्रक्रिया पार पाडली जावी याकरता कलम १४४ लागु करण्यात आले होते. तरीसुध्दा शिवचंद्र तायडे व चैनसुख संचेती गटाचे समर्थकांनी मोठीं गर्दी केली होती.सकाळपासूनच या परीसरात शिवचंद्र तायडे यांचे समर्थक मोठया संख्येने हजर होते.तर माजी आ चैनसुख संचेती हे सुध्दा मोठया संख्येने बाऊंसरसह व आपल्या समर्थकांसह उपस्थितीत झाले होते.माजी आ चैनसुख संचेती यांच्या सह दाखल १३ संचालकांच्या गाडीला अडविण्याचा प्रयत्न सुद्धा तायडे समर्थकांकडून करण्यात आला होता.दोन्ही गटाकडून नारेबाजी सुरू होती.या अनुषंगाने जमाव पांगविण्यासाठी सौम्य लाठीचार्ज केला गेला.तर जमावातील एका गटाने पोलिसांवर दगफेक सुद्धा केली.या लाठीचार्जमुळे जमावाने चांगलाच पळ काढला.

**या १३ संचालकांनी ठरावाच्या बाजूने तर २ संचालकांनी ठरावाच्या विरोधात केलें मतदान**

या प्रक्रियेत साहेबराव शालीग्राम पाटील, नागो अर्जुन राणे, संजय सदाशिव काजळे, भगवान पांडूरंग चोपडे, विजय निवृत्ती साठे, श्रीकृष्ण पुरुषोत्तम खापोटे, मधूकर हरीभाऊ फासे, ज्ञानदेव पांडूरंग वाघोदे, सुनिलकुमार भिकुलाल अग्रवाल, सौ. नंदाबाई भगवान पाटील, सौ.प्रिती नितीन नारखेडे, प्रविण शांताराम क्षिरसागर, कुंदन घनशाम चांडक या १३ संचालकांनी ठरावाच्या बाजूने मतदान केले. तर शिवचंद्र तायडे व योगेश पाटील या २ संचालकांनी ठरावाच्या विरोधात मतदान केल्याने विद्यमान सभापती शिवचंद्र तायडे यांच्यावरील अविश्वास ठराव पारित झाला. या प्रक्रियेत सुभाषराव पाटील व अमोल शिरसाठ हे दोन संचालक गैरहजर राहिले होते.

# संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**

श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव या शाळेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली.

सर्व प्रथम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले यावेळी शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीनिवासन देवकते, जनार्दन आप्पा चितळकर, सर्जेराव मुगूटराव, गणेश मुगूटराव, माऊली जगताप, जगन्नाथ बळवंते, अमोल देवकते, प्रसाद कुलकर्णी, शिवाजी पवार आदींची उपस्थिती होती. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विषयी माहिती सांगून या कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# ‘गरबा- रास’

**लोकनेता न्युज नेटवर्क**

गरबा-रास गुजरातचे प्रसिध्द लोकनृत्य! त्याची लोकप्रियता आपल्या महाराष्ट्रातदेखील वाढत आहे .अस म्हणतात की ,भगवान श्रीकृष्णाने रासनृत्याची निर्मिती केली आणि त्यांची 'उषा'यांनी लास्य नृत्य पृथ्वीवर प्रचारात आणले त्याला 'गरबा'हे नाव पडले.

'गरबा'हा शब्द संस्कृतमधील 'गर्भदीप'या शब्दापासून निर्माण झाला आहे .ज्याचा अर्थ आहे मातीच्या भांड्यातील दिवा.गरबा नृत्य शक्तीपूजेशी संबंधित आहे आणि यामध्ये देवी जगदंबेवरचा गाढ विश्वास दिसून येतो.त्यामुळे देवीच्या नवरात्रोत्सवामध्ये या नृत्याचे खूप उत्साहात सादरीकरण केले जाते.हे नृत्य रात्री सुरू करून मध्यरात्रीपर्यंत केले जाते.यासाठी सर्वच स्तरातील स्त्री-पुरुष चौकाचौकामध्ये एकत्र येऊन हा नृत्योत्सव साजरा करतात.

हे नृत्य गोलामध्ये केले जाते.स्त्रियांच्या डोक्यावर पाण्याने भरलेले मातीचे भांडे (घागर)असते.यामध्ये विड्याचे पान, चांदीचे नाणे असते, ज्याला कुंभ म्हणतात आणि यावर नारळ ठेवलेला असतो .मध्यभागी अंबा मातेची प्रतिमा असते आणि तिच्या शेजारी दिवे लावलेले असतात .तिच्याभोवती सर्व स्त्रिया टाळया देत नृत्य करत फिरतात.मध्यभागी 'ढोली'(ढोलची साथ देणारा कलाकार)असतो.या नृत्याची सुरुवात संथ लयीत होते आणि नंतर मात्र लय वाढत जाते आणि अतिशय जलद व सुंदर नृत्य आकाराला येते.



गुजरात-सौराष्ट्रमधील'दांडियारास'हा पुरुषांसाठी एक अत्यंत प्रभावशाली नृत्यप्रकार आहे.यामध्ये स्त्री -पुरुष काठ्यांचा वापर करतात,ज्यांना आपण 'टिपरी'म्हणतो.टिपरीला टोकाला छोटे छोटे घुंगरू बांधलेले असतात,त्यामुळे टिपऱ्या एकमेकांवर आपल्यानंतर त्यांचा सुंदर किणकिण आवाज येतो आणि तोही संगीतात एकरूप होते .या नृत्यातील नृत्यरचना अशा असतात की आपल्या जोडीदाराबरोबर नृत्य करता करता गोलाकार इतर कलाकारांबरोबर नृत्य करता येते आणि सुरुवातीला असणाऱ्या एका गोलाचे रूपांतर नंतर दोन, तीन ,चार असे अनेक गोलात होते आणि एक अतिशय सुंदर रचनेने नटलेले समूहनृत्य साकारते.

**भारतीय लोकनृत्य**

वाद्ये : यासाठी मुख्य वाद्य असते ढोल आणि त्याबरोबरच डमरू,तबला,नगाडा,एकतारी,रावण हतो,जंटार, पावो,रोहनाई, बासरी,तुरी आणि ततुरी यांची साथ असते.

पोशाख : या नृत्यासाठी काही ठिकाणी स्त्रिया गुजराती साडी तर बऱ्याच ठिकाणी घागरा-चोळी,ओढणी असा पोशाख असतो.या ड्रेसवर काच,कवड्या,कुंदन,अबला यांची कलाकुसर केलेली असते.गळ्यातील आभूषणे झुमका-माटी,बिंदी,बाजूबंद, कंबरपट्टा, वेगवेगळ्या बांगड्या असे दागिने घालतात .पुरुष गुडघ्यापर्यंतच्या उंचीचा गोलाकार कुर्ता (केडीयूम)सलवार(वजनी) डोक्यावर बांधणीच्या ओढणीची पगडी,हातात कडे, अशी वेशभूषा करतात.गरबा-रास हा खूप प्राचीन आणि धार्मिक नृत्यप्रकार आहे .राजशेखर यांच्या 'कर्पूरमंजिरी'या संस्कृत ग्रंथात देखील या नृत्याचा उल्लेख आढळतो.याप्रकारे आज आपण भारतीय लोकनृत्य मधील पाहिलं लोकनृत्यबद्दल जाणून घेतलं. भेटूया असे अनेक लोकनृत्य घेऊन दर शनिवारी आपल्या दैनिक लोकनेता ला .

**लेखिका : रेणू जोशी**
**(अभिनेत्री,नृत्यदिग्दर्शिका, लेखिका)**

## एसीबीच्या कारवाईने खळबळ उडाली!

# अबब..! एक कोटी ६१ लाख ८९ हजार रुपयांचा ऐवज लाचखोर सलगरकरच्या घरी सापडले घबाड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । अण्णासाहेब साबळे**

लाचखोर कार्यकारी अभियंता सलगरकर याच्या घराची आणि लॉकरची झडती एसीबीने घेतली,तेव्हा दीड कोटींपेक्षा अधिकचा ऐवज मिळून आला.एसीबीच्या कारवाईने खळबळ उडाली आहे.पोलिसांनी न्यायालयाकडे विनंती करून सील केलेल्या लॉकरची झडती घेतली असता या लॉकरमध्ये तब्बल ११ लाख ८९ हजार रुपयांची रोख रक्कम तसेच दोन किलो १०५ ग्रॅम वजनाचे सोने असा एकूण एक कोटी ६१ लाख ८९ हजार रुपयांचा ऐवज मिळून आला. यामध्ये सोन्याच्या १११४ ग्रॅम वजनाच्या ७ बिस्किटांचा समावेश आहे.

दरम्यान जिजाऊ प्रकरणात आरोपी न करण्यासाठी लाच प्रकरणात अटकेत असलेल्या निलंबित पो.नि.हरिभाऊ खाडेच्या घरातूनही एसीबीने यापूर्वी कोट्यवधीची माया जप्त केली त्यानंतरची ही मोठी कारवाई ठरली आहे. राजेश आनंदराव सलगरकर हा माजलगाव पाटबंधारे विभागाचा कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत होता.२२ मे रोजी त्यास २८ हजार रुपयांची लाच घेताना बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहात पकडले होते.दरम्यान याप्रकरणी त्याच्याविरुद्ध परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सलगरकर हा मूळचा मिरज (जि.सांगली) येथील रहिवासी आहे. त्याच्यावर ट्रॅप झाल्यानंतर एसीबीच्या पथकाने अंबाजोगाई येथे त्याच्या घराची झडती घेतली होती. त्यावेळी मिरज येथील युनियन बँकेच्या लॉकरची



चावी एसीबीच्या पथकाला मिळून आली होती.दरम्यान सदरचे लॉकर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून सील करण्यात आले होते. त्यानंतर न्यायालयाच्या आदेशाने दि. ३१ मे रोजी या लॉकरची एसीबीच्या अधिकार्यांनी झडती घेतली. यावेळी या लॉकरमध्ये तब्बल १ कोटी ६१ लाख ८९ हजार रुपयांचा ऐवज मिळून आला. यामध्ये ११ लाख ८९ हजारांची रक्कम तसेच दोन किलो १०५ ग्रॅम वजनाचे सोने आढळून आले. ज्यामध्ये १११४ ग्रॅम वजनाची सात बिस्किटे आणि ९९१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने याचा समावेश आहे. पाटबंधारे विभागात कार्यकारी अभियंता म्हणून काम करताना राजेश सलगरकर याने ही संपत्ती कुठून मिळवली? याचा आता एसीबीचे अधिकारी हिशोब लावणार आहेत.एसीबीचे पोलीस अधीक्षक संदीप आटोळे,अप्पर अधीक्षक मुकुंद आघाव उपाधीक्षक शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गुलाब बाचेवाड यांनी केली.पोलिस अंमलदार भरत गारदे,अमोल खरसाडे,चालक अंबादास पुरी यांनी बँक लॉकरची झडती घेतली.

# वंजारी महासंघाच्या माध्यमातून अहिल्या नगरवर होणार सृजनाचा वर्षाव

## दुसरे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाचे दमदार आयोजन

### स्वागताध्क्षपदी आंतरराष्ट्रीय पुरस्कार विजेते कुस्तीपटू राजकुमार आघाव यांची यथार्थ निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्याने संपूर्ण महाराष्ट्रभर आपली ओळख निर्माण केली असून विविध आघाड्यांच्या माध्यमातून महासंघ कार्यरत आहे. साहित्य आघाडीच्या माध्यमातून पहिले राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन सुप्रसिद्ध कवी प्रा.वा.ना.आंधळे यांच्या अध्यक्षतेखाली डिसेंबर २०२२ साली नाशिक येथे संपन्न झाले. या संमेलनाला संपूर्ण महाराष्ट्रातून मिळालेला उत्स्पूर्त प्रतिसाद हा सृजन सामर्थ्याचे कौतुक करणारा होता. संमेलनाची परंपरा अखंडित सुरू ठेवण्यासाठी सदर संमेलन व्दैवार्षिक पद्धतीने घेण्याचा निर्णय ह्या संमेलनात करण्यात आला. त्या अनुषंगाने नोव्हेंबर २०२४ ह्या वर्षी वंजारी महासंघाचे दुसरे एक दिवसीय राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन अहिल्यानगर येथे संपन्न होत आहे. संमेलनाच्या यजमानपदी अहिल्यानगर जिल्हा संपूर्ण वंजारी समाज राहणार असून संपूर्ण आयोजनात वंजारी महासंघ जिल्हा शाखा अहिल्यानगरचे अध्यक्ष मल्हारी खेडकर व महिला आघाडी जिल्हाध्यक्षा रेणुकाताई वराडे-सानप यांचे भरीव योगदान राहणार आहे. संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी आंतरराष्ट्रीय


श्री.गणेश खाडे
संस्थापक अध्यक्ष


कवी प्रा.वा.ना.आंधळे
पहिले संमेलनाध्यक्ष


श्री.राजकुमार आघाव पाटील
स्वागताध्यक्ष


श्री.मल्हारी खेडकर
साहित्य आघाडी जिल्हाध्यक्ष


सौ. रेणुकाताई वराडे-सानप
महिला आघाडी जिल्हाध्यक्ष

कीर्तीचे कुस्तीपटू राजकुमार लक्ष्मण आघाव पाटील यांची यथार्थ निवड करण्यात आलेली आहे. त्यासोबतच लवकरच स्वागत समिती तसेच आयोजन समिती सदस्यांची घोषणा करण्यात येईल असे महसंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा विचारवंत, साहित्यिक, लेखक, अध्यात्मिक मार्गदर्शक श्री. गणेशजी खाडे (बीड) यांनी एका पत्रकान्वये कळवले आहे.

पहिल्या राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष खान्देशरत्न प्रा.वा.ना.आंधळे हे लवकरच आपले उत्तराधिकारी म्हणून दुसऱ्या साहित्य संमेलन अध्यक्षांची निवड घोषित करतील असेही या पत्रकात म्हटले आहे.सदर संमेलन संस्मरणीय व ऐतिहासिक होण्याच्या दृष्टीने अहिल्यानगर येथील महिला जिल्हाध्यक्षा रेनुकाताई वराडे- सानप यांच्या निवासस्थानी अहिल्यानगर वंजारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष मल्हारी खेडकर सर तथा जिल्ह्यातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीस वंजारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश खाडे यांनी मार्गर्शन केले.

# शिवा संघटनेच्या वतीने कंधार येथे महात्मा बसवेश्वर जयंती मोठ्या उत्साहात साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

शिवा अखिल भारतीय वीरशैव संघटनेच्या कंधार तालुका शाखेच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही महात्मा बसवेश्वर यांची ८९३ वी जयंती नुकतीच मोठ्या उत्साहात कंधार येथे संपन्न झाली.या कार्यक्रमास गुरुउपदेश सिध्ददयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर यांनी केले.

शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.मनोहर धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली तर उद्घाटन डॉ .संजय पवार अध्यक्ष ग्रामीण शिक्षण प्र.मं.नेहरुनगर यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संजय भोसीकर माजी जि.प.सदस्य, रामचंद्र येईलवाड राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेल राज्याध्यक्ष,माजी जि.प.सदस्य अँड.विजय धोंडगे, माजी नगरसेवक गणेश कुंटेवार, माजी पं.स.सदस्य उत्तम चव्हाण, शिवसेना तालुका प्रमुख परमेश्वर जाधव,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा सरचिटणीस बालाजी पेठकर,एम.आय.एम. विधानसभा अध्यक्ष अब्बु भाई, सोशल मिडिया प्रमुख सतीश देवकत्ते, शिवा संघटना राष्ट्रीय उपाध्यक्ष दत्ता खंकरे,राज्य उपाध्यक्ष वैजनाथ तोनसुरे, सेवा जनशक्ती पक्षाचे मुख्य प्रदेश प्रवक्ते विठ्ठल ताकबिडे, शिवा कर्मचारी महासंघ राज्य



सरचिटणीस संजय कोठाळे, जिल्हा संपर्कप्रमुख इंजि.अनिल माळगे ,जिल्हाध्यक्ष संभाजी बुड्डे,संभाजी पावडे ,रविंद्र पांडागळे,शुभम घोडके आदींच्या उपस्थितीत होते, या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जी.एस.मंगनाळे यांनी तर सुत्रसंचलन संभाजी पावडे यांनी तर आभार बाबुराव फसमले यांनी मानले.महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक माईचं मंदिर कंधार दुपारी ६ वाजता मिरवणुकीचा प्रारंभ तर समारोप नामदेव महाराज मंगल कार्यालय कंधार येथे झाला .कंधार तालुक्यातील सर्व विरशैव लिंगायत बंधू आणि भगिनींनी तसेच सर्व समाजातील बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होती. यावेळी शिवाजीराव कहाळेकर,डी.जी.पांडागळे, विनायक कल्याणकस्तुरे, गणेश गोरे, सतिश घोडके, त्र्यंबक भोसीकर,बालाप्रसाद मानसपुरे,भुजंगराव कारामुंगे,बाबुराव अभंगे,मल्लिकार्जुन किडे, अभिषेक मानसपुरे, बालाजी कल्याणकस्तुरे,प्रा.रामकिशन पालीमकर,बाबुराव कैलासे, चंद्रकांत गोंड,शिवराज भोसीकर,एम.डी.पेठकर, बी.टी.भुरे,नामदेव कल्याणकस्तुरे, साधू वडजे,एम.जी.भुरे,डी एन मंगनाळे,ज्ञानेश्वर घोडके , बाबुराव मुधळे, चक्रधर हाळीघोंगडे , शिवराज घोडके, हरिहर विश्वासराव आदीसह महात्मा बसवेश्वर जयंती मिरवणुकीमध्ये कंधार तालुक्यातील सर्व विरशैव लिंगायत बंधू आणि भगिनींनी तसेच सर्व समाजातील बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# राजमाता अहिल्यामाई होळकर यांची जयंती साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

कमलशिल फाउंडेशन बीड येथील कार्यालयात,बहुजन हितदक्ष,राजमाता,अहिल्यामाई होळकर यांची २९९ व्या जयंती निम्मित,आयु.रावसाहेब उनवणे (सामाजिक कार्यकर्ते संत रविदास संस्था) यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, या प्रसंगी त्यांनी राजमाता अहिल्यामाई होळकर यांच्या कार्याला उजाळा दिला पतीनिधनानंतर सती प्रथेच्या विरुद्ध केवळ विचार मांडणारी नाही तर प्रत्यक्ष बंड करून पेशव्यांच्या नाकावर टिचून २९ वर्ष शासन व प्रशासन सांभाळून रयतेचे प्रती शिवराज्य निर्माण करणाऱ्या पुरुष प्रधान व्यवस्थेला काट शाह देऊन मातृसत्ताक व्यवस्थेचे पुनर्जीवन करणाऱ्या,हातामध्ये पिंड नाही तर तलवार घेऊन राज्यकारभार करणाऱ्या व आपल्या राज्यात समता,स्वातंत्र्य, बंधुत्व व न्याय प्रस्थापित



करणाऱ्या राजमाता, राष्ट्रमाता, पुण्यश्लोक अहिल्यामाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त पुन्हा एकदा त्यांच्या मानवमुक्तीच्या कार्य व कर्तृत्वास विनम्र अभिवादन व जनतेला प्रेरणादायी शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी संचालक भाग्यविधाता साळवे, हर्षद,श्रुती, ी.प्रतीक, ढवळे सर,कांबळे सर यांची उपस्थिती.

# आंध्रा बसचा मुक्काम महर्षी चौक ऐवजी महाराष्ट्र बस स्थानकात

## उपविभागीय अधिकारी दाभाडे मॅडम याकडे गांभीर्याने लक्ष देतील का ?

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

महाराष्ट्र शासनाचा व राष्ट्रीय परिवहन महामंडळ यांचा महसूल बुडत आहे. तहसीलदार यांनी दिलेल्या पत्राची अंमलबजावणी होत नसून अनाधिकृत आंध्रा बस स्टॉप हे महर्षी वाल्मिकी चौक येथे राष्ट्रीय राष्ट्रीय परिवहन महामंडळ विभागासोबत कसलाही करार तेलंगाना येथील आगारप्रमुखांनी न करता तेलंगणातील बसेस चालूच ठेवल्या.

(तेलंगणा राज्यातुन येणाऱ्या बसेस भर रोडवर उभे असलेल्या कारणामुळे मुळे यु- टर्ण वळन रस्त्यावर बस उभा असल्यामुळे कंटेनर भर वेगाने बाळापूर येथे राहणारे इस्माईल यांच्या डोक्या चा चेंदामेंदा होऊन अखेर जिव गेला?)

सविस्तर वृत्त असे की धर्माबाद ही एक मोठी बाजार पेठ असून दररोज आंध्रा प्रदेश व तेलंगणा आणि महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यातून हजारो लोक विविध कामांच्या निमित्ताने धर्माबाद शहरात येत असतात. तालुक्यात महाराष्ट्र बस स्थानक आहे तेलंगणातील काही बस सेवा फक्त महर्षी चौक पर्यंतच येऊन तिथून परतत होतात त्यामुळे इतर नागरिकांना चक्क महाराष्ट्र बस स्थानकापासून महर्षी



तहसीलदारांच्या पत्राचा आदेश स्थानिक प्रशासनाने कोरा पेपर म्हणून वाळीत ठेवला. म्हणून तेलंगणातील बस महाराष्ट्र बस स्थानकात येण्याऐवजी अनधिकृत (आंध्रा बस स्टॅन्ड) येथेच येऊन परत तेलंगाना रवाना होत आहे.यात तालुक्यातील एका मोठ्या अधिकाऱ्याने लाच घेतली का! असा प्रश्न जनतेतून निर्माण होत आहे.

चौक पर्यंत पायी चालत जावे लागते किंवा ऑटो ने तीस रुपये देऊन जावे लागत असे याचा त्रास महाराष्ट्रातून आंध्र प्रदेश व तेलंगणा राज्यात जाणाऱ्या महाराष्ट्रीयन प्रवाशांना होत होता म्हणून रिपब्लिकन सेनेचे तालुका अध्यक्ष साहेबराव दुगाने, रिपब्लिकन सेनेचे महासचिव गंगाधर हनमंते व वंचित बहुजन आघाडी चे शहर उपाध्यक्ष किरण गजभारे, यांनी व सहकार्यांनी दिनांक १३ सप्टेंबर रोजी रिपब्लिकन सेनेचे धर्माबाद तालुकाध्यक्ष साहेबराव दुगाने यांच्या नेतृत्वात महर्षी चौक येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाची दखल घेत धर्माबाद तहसीलदार यांनी भैसा व निर्मल वाहतूक नियंत्रण अधिकाऱ्यांना पत्र देऊन सदर आंदोलनांची माहिती देत तेलंगणा राज्यातून येणाऱ्या बसेस महर्षी चौक अनधिकृत ( आंध्रा बस स्टॉप) येथे थांबवण्या ऐवजी ते अधिकृत महाराष्ट्र बसस्थानकात थांबवण्यात यावेत अन्यथा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो अशी लेखी विनंती वजा सल्ला दिला होता.

या रास्ता रोको आंदोलनाच्या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी मा. अभिजीत राऊत, पोलीस अधीक्षक नांदेड, धर्माबाद तहसीलदार व पोलीस निरीक्षक व तेलंगणा राज्याच्या आगार प्रमुख यांना देण्यात आले होते.

या दरम्यान सर्व बाबींची चौकशी करून नायब तहसीलदार गावंडे यांनी तोंडी व लेखी आश्वासन दिले व सदरील विभागाला पत्रव्यवहार केला त्यामुळे आज पासून (आंध्रा बस स्टॉप) च्या ऐवजी महाराष्ट्र व स्थानक या ठिकाणी तेलंगणातील सर्व बसेस थांबण्यात येणार आहे. त्यामूळे महाराष्ट्रातून आंध्र व तेलंगणा राज्यात जाणाऱ्या धर्माबाद तालुका वाशीयांसाठी व महाराष्ट्र राज्याच्या विविध भागांतून धर्माबाद शहरात ये जा करणाऱ्या प्रवाशांची गैरसोय या पुढे होणार नसल्याने समाधान व्यक्त केल्या जात आहे. परंतु तहसीलदारांचा आदेश तेलंगानातील आगार प्रमुख यांनी कचऱ्याच्या डब्यात टाकून आपला मनमानी कारभार सुरूच ठेवला आहे. याकडे वाहतूक शाखेने सुद्धा कानाडोळा केला आहे. अनधिकृत आंध्रा बस स्टॉप या ठिकाणी बसेस थांबून विद्यार्थी नागरिक व्यवसायिक यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे..

**ही मागणी तालुक्यातील व्यापारी वर्ग शिक्षक प्रवासी कर्मचारी यांच्या हितासाठीच आहे व या मागणीचा शासनाने दखल घेऊन लवकरात लवकर योग्य तो निर्णय घ्यावा यासाठी भाजप पक्ष आंदोलन करताना जाहीर पाठिंबा असणार आहे**

**-(रवींद्र पोतगंठीवार)**

**मा. तहसीलदार साहेबांनी या सर्व बाबींची दखल घेऊन लवकरात लवकर हा अजब गजब कारभार थांबवावा अन्यथा होणाऱ्या परिणामास संबंधित प्रशासन जबाबदार असेल**

**-(संजय पवार माजी नगरसेवक)**

**धर्माबाद हे तेलंगाना सीमा वरती भाग असून व्यापारासाठी दळणवळणासाठी शैक्षणिक क्षेत्र इत्यादींसाठी महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे तेलंगणातील बस हे महाराष्ट्र बस स्थानकात येत नसल्यामुळे प्रवाशांना ऑटोला वेगळे पैसे मोजावे लागत आहेत. यात प्रवाशांची गैरसोय होत आहे -(गणेश गिरी)**

दैनिक लोकनेता




# समाज विघातक मनुस्मृती शैक्षणिक विषय होवूच शकत नाही

## देशव्यापी संविधान जन जागृती व साक्षरता अभियान आयोजक डॉ.माकणीकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित संविधानाचे राज्य असून, बाबासाहेबांनी अख्खी च्या अख्खी मनुस्मृती जाळून टाकली आहे, त्यामुळे समाज विघातक मनुस्मृती शैक्षणिक विषय होवूच शकत नाही. शिकवायचेच असेल तर भारतीय संविधान शिकवा असे मत देशव्यापी संविधान जनजागृती व साक्षरता अभियानचे राष्ट्रीय आयोजक पँथर डॉ राजन माकणीकर यांनी व्यक्त केले.




महाड या ऐतिहासिक ठिकाणी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृती दहन केली होती त्याच धर्तीवर वर चांगल्या इतिहासाची पुनरावृत्ती म्हणून जाहीर निषेधार्थ

शरद पवार राष्ट्रवादी गटाचे आमदार श्री. जितेन्द्र आव्हाड यांनी मनुस्मृती दहन कार्यक्रम आखून शिंदे फडणवीस आणि अजित पवार सरकारच्या शैक्षिणक धोरणाचा कडाडून विरोध केला. यावेळी अनावधानाने गालबोट लागले, जितेंद्र आव्हाड हे बाबासाहेबांना बाप मानतात आणि कोणता बाप मुलाला माफ करणार नाही? अस होणार नाही, त्यामुळे त्या प्रकरणाचे राजकरण कुणीही करू नये अशी विनंती धम्मसेवक डॉ. माकणीकर यांनी केली आहे.समाजभूषण डॉ माकणीकर म्हणाले की, आव्हाडांनी मनुस्मृती जाळली याचा भाजपा व त्यांच्या समर्थक पक्षांना राग नाही आला पण बाबासाहेबांचा फोटो असलेले पोस्टर जाळले याचा राग आला अस भासवून ते आव्हाड विरोधी वातावरण निर्माण करत आहेत, आंबेडकरी समाजाने आपापल्या गावात मनुस्मृतीचे दहन करून या सरकारचा निषेध व्यक्त करून आव्हाडांच्या प्रमाणिक आंदोलनाला कृतीतून समर्थन नोंदवावे तसेच मनुस्मृती शिकवणीचा निर्णय सरकारला मागे घेण्यास भाग पाडावे.रिपब्लीकन पँथर नेते दिवंगत ईश्वर कांबळे यांच्या इच्छेनुसार देशव्यापी संविधान जनजागृती व साक्षरता अभियान अंतर्गत आम्ही मागील २५ वर्षापासून भारतीय संविधान शालेय माध्यमिक अभ्यासक्रमात शिकवनी साठी स्वतंत्र विषय म्हणून समाविष्ट करण्यात यावे यासाठी अभियान राबवत असून त्यासंदर्भातील पत्रव्यवहार शासन व प्रशसानात केला आहे, या मनुवादी सरकारच्या बुडात दम असेल आणि खरच काही शिकवायचे असेल तर डॉ. आंबेडकर लिखित भारतीय संविधान शिकवावे.

असे आंबेडकरी कट्टर समर्थक डॉ माकणीकर म्हणाले.मोदी सरकार मुळातच संविधान विरोधी असून बहुजनांच्या हक्काचे संरक्षण करणाऱ्या संविधानाची आधीच त्यांनी पायमल्ली केली आहे, त्यामुळे त्यांनी डावपेच करून विविध राज्यात सरकारे बनवली आहेत ती असंवैधानिक सरकारे आहेत असे मला वाटते, त्यामुळे मोदीच्या नेतृत्वात असलेल्या सरकार कडून भारतीय संविधानाच्या समर्थनात कोणती अपेक्षा होणे अशक्यप्राय आहे. अशी निराशा ही विद्रोही पत्रकार डॉ. राजन माकणीकर यांनी व्यक्त केली.

# भोकरदन येथे पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर यांची जयंती साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन | राम शिंदे**



भोकरदन येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या भारतातील, मावळयांच्या 'तत्त्वज्ञानी माहाराणी' म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी नर्मदा तीरी, इंदूरच्या दक्षिणेस असलेल्या महेश्वर या ठिकाणी आपली राजधानी हलविली. मल्हाररावांनी त्यांना प्रशासकीय व सैन्याच्या कामात पारंगत केलेल होते. त्या आधाराने अहिल्याबाईंनी इ.स. १७६६ ते इ.स. १७९५, म्हणजे त्यांच्या मृत्यूपर्यंत माळव्यावर राज्य केले होते.अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले, एवढचं नाही तर त्यानी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक धोरण आखल प्रसिद्ध हिंदू मंदिराचा त्यांनी जीर्णोद्धार केला; महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यांत द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. वेरावळ येथील सोमनाथचे गझनीच्या महंमदाने उध्वस्त केलेले देऊळ बघून अहिल्यादेवींनी शेजारीच एक शंकराचे एक देऊळ बांधले. सोमनाथला जाणारे लोक या देवळालाही भेट देतात. अहिल्याबाईंना प्रजेस कल्याणकारी असे काम करण्याची आवड होती अश्या या आदर्श कार्यकतृत्वास त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याला उजाळा देऊन जयंती साजरी करण्यात आली यावेळी विकास जाधव, आप्पासाहेब जाधव,अनिल गिरनारे सर,ॲड समाधान लोखंडे,अमोल जाधव,दीपक जाधव,निवृत्ती लोखंडे,वैभव लोखंडे,दत्ता शिरसाठ, लहू शिरसाठ,शुभम कांबळे,आनंदा पगारे,विजय कड यांची उपस्थिती होती.

# सरकी बियाणे जास्त भावाने विक्री करणाऱ्या दुकानदारावर कारवाई करा-अनिल राऊत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पैठण | प्रतिनिधी**



पैठण तालुक्यातील दरवर्षी सररस पणे बोगस बियाणाचा सुळसुळाट मे महिन्यापासून सुरू होत असतो चड्या भावाने सरकी तूर सोयाबीन अनेक बियाणे दुकानदार जास्त भावाने विकून शेतकऱ्याची फसवणूक करतात कापूस बियाणे मधील शेतकऱ्यांची फसवणूक व जास्त किमतीमध्ये शेतकऱ्यांना बियाणे विक्रीमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी छावा क्रांतिवीर संघटनेने पैठण तालुक्यातील ठोस पावले उचललेली असुन प्रत्येक कृषी सेवा केंद्रावर कृषी सहाय्यकाच्या निगराणीखाली कापूस बियाणे विकली जाणार आहे असे छावा क्रांतिवीर सेनाच्या निवेदनाद्वारे सांगण्यात आले आहे यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक सरकी बीयाने मध्ये टाळली जाणार आहे कृषी सेवा केंद्रा वाले चढ्या भावाने विकणारे सरकी वान कोणते कबाडी-१४४ बाहुबली एमआरसी-७९१८ धनदेव जादु मागील वर्षी हे बियाणे चढ्या भावाने विकली गेली आहे यावर्षी सुद्धा कबाड्डी बियाणे देण्यास शेतकरी यांना दुकानदार टाळाटाळ करत आहे ह्या वानाचा शॉर्टेज दाखवून चढ्या भावाने विक्री केली जाते म्हणून दी.२८तहशिलदार सारंग चव्हाण यांना निवेदनाद्वारे केली आहे बोगस बियाणे विकणाऱ्या दुकानदारावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी छावा क्रांतिवीर सेनेचे प्रदेश सरचिटणीस अनिल राऊत मराठवाडा सचिव भगवान सोरमारे कृष्णा काळे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बारे भाऊराव धरम प्रशांत साळुंखे दादा मोरे राकेश वाघे आदी पदाधिकारी यावेळेस उपस्थिती दर्शवली होती.

# राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या आष्टी तालुका उपाध्यक्षपदी युवा पत्रकार दादासाहेब पवळ यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**



राज्यासह राष्ट्रीय पातळीवर पत्रकारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे व त्यांच्या न्याय हक्कासाठी लढत असलेल्या राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या आष्टी तालुकाध्यक्ष पदाची नुकतीच आण्णासाहेब साबळे यांची निवड जाहीर केल्यानंतर आज ३१ मे रोजी आष्टी तालुका उपाध्यक्ष पदाची घोषणा संघाचे जिल्हाध्यक्ष डी.एम.मुजमुले यांनी जाहीर केली आहे.

राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष विजयजी सूर्यवंशी,राष्ट्रीय कार्याध्यक्ष बाळासाहेब अढांगळे,राष्ट्रीय सचिव प्रवीण परमार यांच्या मार्गदर्शनाखाली व राज्य अध्यक्ष संतोष जाधव,राज्यसचिव निलेश ठाकरे,मराठवाडा अध्यक्ष शंकरसिंह ठाकूर,उपाध्यक्ष मुबशिर खतिब,यांच्या मार्गदर्शनाखाली व आष्टी तालुका अध्यक्ष आण्णासाहेब साबळे यांच्या विचारानुसार आष्टी तालुका उपाध्यक्ष पदी दैनिक लोकप्रभा प्रतिनिधी दादासाहेब त्रिंबकराव पवळ यांची निवड जिल्हाध्यक्ष डी.एम.मुजमुले यांनी जाहीर केली.दादासाहेब पवळ यांच्या निवडीचे मित्रपरिवार,पत्रकारसह विविध क्षेत्रातून अप्रत्यक्ष प्रत्यक्ष मिडियामाधातून अभिनंदनाचा वर्षाव होताना दिसत आहे.

# श्री.सुधाकरराव वानखेडे सर यांचा कर्तव्यपूर्ती सोहळा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड | सय्यद रहीम रजा**




३१ मे २०२४: श्री तेजमल गांधी कृषी विद्यालयाचे आदरणीय शिक्षक श्री. सुधाकरराव वानखेडे सर यांच्या निवृत्तीचा निरोप समारंभ दिनांक ३१ मे २०२४ रोजी विद्यालयाच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. श्री. सुधाकर वानखेडे सर यांनी विद्यालयात ३२ वर्षे प्रदीर्घ सेवा बजावली आहे.


समारंभाची सुरुवातीस पाहुण्यांचे स्वागत करून श्री सुधाकर वानखेडे सर यांना शाल, आहेर व पुष्पगुच्छ देऊन सपत्नीक सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला, श्री तेजमल गांधी कृषी विद्यालयाचे सन्माननीय चेअरमन डॉ. विजयराव माने साहेब, ब्राह्मणगावचे सरपंच सन्माननीय परमात्मा अण्णा गरुडे, तसेच विद्यालयाचे प्राचार्य प्रकाशराव पेंटेवाड सर, माजी विद्यार्थी, पालक व अनेक मान्यवर उपस्थित होते . या कर्तव्यपूर्ती सोहळ्यामध्ये कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री पांडुरंग माने सर यांनी केले. तसेच ३२ वर्षाच्या सेवापूर्तीवर श्री.अशोक शिरफुले सर, श्री.दतराव कदम सर प्राचार्य प्रकाशराव पेंटेवाड सर यांनी सरांच्या मागील आठवणींना उजाळा दिला व श्री सुधाकर वानखेडे सरांच्या पुढील भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्यात. कार्यक्रमाचे अध्यक्ष सन्माननीय डॉ.विजयराव माने साहेब यांनी आपल्या भाषणात श्री. सुधाकर वानखेडे सर यांच्या कार्याचा गौरव केला. त्यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि वैयक्तिक विकासात केलेल्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. माजी विद्यार्थी कोंडरवाड सर यांनी आपल्या आवडत्या शिक्षकाबद्दल आठवणींना उजाळा दिला .आणि त्यांच्या मार्गदर्शनाबद्दल आभार मानले.

श्री. वानखेडे सर यांनी आपल्या भाषणात शाळेच्या आणि विद्यार्थ्यांच्या आठवणींना उजाळा दिला. त्यांनी सर्व सहकाऱ्यांचे, विद्यार्थ्यांचे आणि शाळेच्या व्यवस्थापनाचे आभार मानले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. प्रशांत काळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिक्षक श्री. पांडूरंग माने सर यांनी केले.

# लाईट जोडले नसतानाही महावितरणाद्वारे बिल महावितरणाचा अजब कारभार ; शेतकऱ्यांन समोर बिला चा मोठा प्रश्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शेख जफर | भोकरदन**







भोकरदन तालुक्यातील देहेड शिवारातील गट न १८ म्हधील शेतकरी नामे आनंदाबाई आनंदा बावस्कर व सदाशिव नामदेव तोटे या शेतकऱ्यांना एच व्ही डी एस या योजनेअंतर्गत सन २०१९ पासून स्वातंत्र्य रोहित्र मंजूर असून त्या ठिकाणी प्रत्यक्ष काम देखील झालेला आहे मात्र त्या स्ट्रक्चर मध्ये आज पर्यंत ही विद्युत पुरवठा करण्यात आल्या नाही शेतकरी महावितरणाकडे गेल्या २०१९ पासून विनंती करीत आहे मात्र अद्यापही त्यात विद्युत पुरवठा करण्यात आला नसून नुसतेच या शेतकऱ्यांना महावितरण कडून कोणती विद्युत पुरवठा न करता लाईट बिल भरणे असे बिल त्यांना प्रत्येक महिन्याला पाठवीत आहे यामुळे हे शेतकरी हतबल झाले असून आपल्याला कोणताही विद्युत पुरवठा नसतानाही महावितरणाकडून अशा प्रकारचे बिले येत असल्याने शेतकऱ्यांसमोर मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे हा प्रकार महावितरण करीत असल्याने सावला गोंधळ उडाला असून हे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात मनस्ताप वाढला आहे ते गेल्या २०१९ पासून विद्युत पुरवठा जोडण्यात यावा म्हणून महावितरणाचे लाईनमेन तसेच इंजिनियर यांच्याकडे पाठपुरावा करीत असून त्यांना नुसत्या थापा मारल्या जात असल्याने शेतकऱ्यांसमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे याकडे वरिष्ठांनी तातडीने लक्ष देऊन या शेतकऱ्यांना बिले पाठविण्यात आले आहे ते तात्काळ थांबून त्यांचा विद्युत पुरवठा सुरळीत चालू करावा व नंतरच त्यांना बीले देण्यात यावी अशी मागणी या शेतकऱ्यांतून होत आहे .

**संबंधित शेतकऱ्यांच्या एच व्ही डी एस या योजनेअंतर्गत रोहित्र बसवण्यात आले असून त्या रोहित्रंचे संबंधित कॉन्ट्रॅक्टदाराने पूर्ण काम केले नसल्याने त्यामध्ये विद्युत पुरवठा करण्यात आला नसून त्यांना बिले येत असेल तर त्यांनी रीतसर आमच्या कार्यलयाला तक्रार करावी**

**–नागेश बोर्डे लाईनमन देहेड**

**आम्हाला गेल्या सन २०१९ पासून आमच्या विहिरीवर एक रोहित मंजूर असून येथे स्ट्रक्चर उभा करण्यात आला असून रोहित देखील बसवण्यात आले आहे नंतर त्यामध्ये विद्युत पुरवठा करण्यात आला नसून आम्हाला कोणतीही कनेक्शन देण्यात आले नसून नुसतेच महावितरण कडून बिले पाठवून आम्हाला चिंतेत टाकण्यात येत आहे आम्ही कोणत्याही प्रकारची लाईन वापरले नसताना दिले आता कशी करू हा प्रश्न त्यांना करत आहो परंतु संबंधित इंजिनियर लाईनमन कानावर घेत नाही तरी आम्हाला न्याय द्यावा**

**–आनंदाबाई अनंता बावस्कर शेतकरी**

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904